## आदेश निशाणी क्र. ०५ खाली

**(CNR NO MHSN0500 -859-2023)**

१. अर्जदार हिने घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ कलम २३ अन्वये अर्ज दाखल केला असून प्रस्तुत अर्जान्वये रक्कम रुपये २५,०००/– अंतरीम पोटगी मिळण्याची विनंती केली आहे.

**अर्जदाराचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. जाबदार क्र.१ हा अर्जदाराचा पती असून जाबदार क्र. २ सासू व जाबदार क्र. ३ हे दिर आहेत. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा विवाह दि.२४/०४/२०२२ रोजी कुंडल येथील आष्टेश्वर सांस्कृतिक भवन येथे झाला. विवाहामध्ये अर्जदार यांचे आई वडीलांनी १ तोळयाचा सोन्याचा नेकलेस, ३ ग्रॅम कानातील टॉप्स व चांदिचे दागिणे तसेच मंगळसुत्राकरीता र.रु. ५०,०००/– जाबदार यांना रोख स्वरुपात देवून संसार उपयोगी साहित्य वगैरे एकूण लग्नखर्च र.रु. ५,००,०००/– एवढा केलेला आहे. विवाहापूर्वी साखरपुडा व याद्यांच्या कार्यक्रमास अर्जदार यांनी जाबदार यांना ६ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी व र.रु. १,००,०००/– खर्च आला होता. लग्नानंतर अर्जदार सुरुवातीस जाबदार यांच्या आजोळी कोळेवाडी, ता. कराड, येथे व दि.२५/०४/२०२२ रोजी कांदिवली येथे नांदण्यासाठी गेली. त्यानंतर २ ते ३ महिन्यानंतर जाबदार क्र. २ यांनी अर्जदार हिला घरातील कामावरुन तसेच लग्नातील मानपानावरुन वाद घालणेस सुरुवात केली. जाबदार क्र. २ यांनी अर्जदार यांचेशी भांडण केले. तसेच तू घरात बसून आयती खाणार आम्हाल खर्च करावा लागणार, तुझ्या बाबाने माझ्या मुलाची हौस केली नाही, मी माझ्या घरी कोणाला बोलवत नाही कारण मला

लाज वाटते, हा लाढणा असाच सांभाळायचा आहे, हिला आयते बसून घालावे लागणर आहे असे अपमानास्पत बोलल्या. त्यावेळी जाबदार क्र. ३ हा अर्जदार हिला लग्नामध्ये तुम्ही आमचा मान ठेवला नाही, या घरात आईचे ऐकावे लागेल असे म्हणाला व जाबदार क्र. १ ने जाबदार क्र. २ व ३ ची बाजून घेवून, आई व आकाश म्हणतात ते बरोबरच आहे, तूला आईचे ऐकावे लागेल व सहन करावे लागेल असे म्हणाले. जाबदार क्र. १ ते ३ अर्जदार हिला वेळोवेळी मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देत होते. सप्टेंबर २०२२ मध्ये अर्जदार ही गर्भवती राहिली असता तिला जाबदार क्र. १ व २ यांनी एवढया लवकर आपल्याला मुल नको, तू गर्भपात करुन घे असे म्हणत होते. तिने गर्भपात केला नाही म्हणून तिला सतत शारिरीक, मानसिक त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर दि.२७/०२/२०२३ रोजी अर्जदार यांची प्रीमॅच्युअर डिलेव्हरी झाली व अर्जदार यांनी मुलास जन्म दिला. प्रीमॅच्युअर डिलेव्हरीमुळे बाळाला दुसऱ्या हॉस्पीटलमध्ये अॅडमीट करावे लागले व तेथे १५ दिवस उपचारानंतर बाळ मयत झाले. बाळाच्या जन्मानंतर देखील जाबदार क्र. १ ते ३ हे बाळास बघण्यासाठी आले नाही, अर्जदार हिचे आईवडील व भाऊ–बहिण हॉस्पीटलमध्ये थांबले होते. जाबदार क्र. १ ते ३ यांच्यापैकी कोणीही हॉस्पीटलमध्ये थांबले नाही व बाळाला उपचारासाठी येणारा खर्च देणार नाही असे म्हणून निघून गेले होते. जाबदार क्र.१ यांनी अर्जदार यांना बाळाच्या जन्मावरुन शिवीगाळ केली तसेच अर्जदार हिच्या सोबत संसार करायची इच्छा नाही व अर्जदार हिला नांदणेस नकार दिला. त्यानंतर दि.१७/०३/२०२३ रोजी अर्जदार या तयांच्या माहेरी आई वडीलांसांबत निघून आल्या. त्यानंतर दोन दिवसांनी

अर्जदार यांनी जाबदार यांना फोन करुन नांदावयास घेवून जाणेबाबत विचारण केली असता जाबदार यांनी अर्जदारांना तू तेथेच रहा मला तुझे सोबत संसार करणेचा नाही, मी वकीलांशी बोलून आलोय मला घटस्फोट दे असे म्हणाले. तसेच जाबदार यांनी दि. १७/०३/२०२३ व दि.११/०६/२०२३ रोजी अर्जदार हिस घरातून हकलून दिले तेव्हा पासून ती माहेरी रहात असून तिला उत्पन्नाचे तिला आर्थिक उत्पन्नाचे कोणतेही साधन नसल्याने तिने वरील प्रमाणे पोटगीची मागणी केली आहे.

**जाबदार यांचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

४. जाबदार यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून लग्न मान्य केले असून इतर आरोप फेटाळले आहेत. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार जाबदार क्र. १ यांचे वडीलांचे हृदय विकाराच्या झटक्याने दुखद निधन झाले. त्यामुळे साऱ्या कुटुंबाची शारीरिक व मानसिक अवस्था पूर्णपणे ढासळली. जाबदार क्र. १ च्या आई या पति निधनामुळे वारंवार रुग्णालयात दाखल करुन उपचार घ्यावे लागत आहे. विवाहानंतर दोन दोन महिन्यानंतर अर्जदार हि किरकोळ कारणावरुन चिडचिड करुन जाबदार क्र. १ ची आईसोबत किरकोळ गोष्टीवरुन वाद काढून भांडण करु लागली. तसेच त्यांचया आईला घालून पाडून बोलणे टोमणे मारणे असे प्रकार नित्याचे होऊ लागले. अर्जदार हिचा वाढदिवस देखील हौस मौज करुन साजरा केला होता. दर आठवडयाच्या शेवटी अर्जदार हिला जाबदार क्र. १ मुंबई येथे फिरायला, चित्रपट पहायला व तिचे आवडीचे मिष्टान्न व भोजण करण्यास घेवून जात होते. अर्जदार या मुंबई यिो रमतील व उत्साही राहतील याची जाबदार क्र. १ कसोशिने काळजी घेत होते. सर्व व्यवस्थित असताना

अर्जदार हि किरकोळ कारणावरुन वाद घालून चिडचिड करुन भांडण करत होती. तसेच जून २०२२ ते नोव्हेबर २०२२ या कालावधीत तिचे आई वडील, भाऊ, चुलत भाऊ हे पाच ते सहा वेळा मुंबई येथे आलेले आहेत. हे सर्वजण जाबदार यांचेवर दहशत माजवून दमदाटी व धमकीची भाषा करत असत. अर्जदार या गर्भवती राहिल्या नतर माहेरी कुंडलला गेल्यानंतर मी गर्भपात करणार आहे मला बाळ नको आहे असे बोलत होत्या. जून २०२२ मध्ये अर्जदार हि स्वयंपाक घरातील चाकू काढून तो जाबदार यांचेवर उगारला होता. त्यांना तिचे नातेवाईकांनी समजावून सांगितल्यानंतर अर्जदाराचा राग तात्पुरता थंड झाला व नंतर जानेवारी २०२३ मध्ये देखील तिने असाच प्रकार पुन्हा केला होता. अर्जदार गर्भवती असताना तिला नामांकित स्त्रीरोग तज्ञाकडे उपचार घेतले. अर्जदारच्या हट्टामुळे व कुटुंबीयांच्या दबावापोटी आपल्या व्याधीग्रस्त आई व अविवाहित भावाला सोडून जाबदार क्र. १ हे अर्जदार हिच्यासोबत पनवेल येथे भाडयाने राहू लागले. दि. २७/०२/२०२३ रोजी अर्जदार हिला त्रास चालू झाल्याने प्रीमॅच्युअर डिलीव्हरी झाली. तिने मुलाला जन्म दिला व बाळाला एनआयसीयु ट्रीटमेंट करीता दुसऱ्या दवाखान्यात नेण्यात आले. दि.१४/०३/२०२३ रोजी उपचार चालू असताना बाळाचा मृत्यु झाला. त्यामुळे अर्जदार या जाबदारच्या आईवर ओरडत, अपशब्द वापरत होती. जाबदार यांनी अर्जदार हिला नांदणेस नेण्यासाठी गावी कुंडल येथे घरी गेले असता सर्वांना अर्जदार यांचे घरच्यांनी अपमानास्पत वागणूक देवून नांदणेस येण्यास नकार दिला. अर्जदार हिने आपल्या अत्यंत रागीट व उध्दट स्वभावामुळे जाबदार यांच्या प्रपंचावर केवळ आर्थीक हव्यासापोटी आपले नाते तोडून नवा जोडीदार करण्याच्या

प्रयत्नात अशा स्वरुपाचा खोटे मजकुराचा जाबदार यांच्यावर निखालस खोटे व बिनबुडाचे आरोप करणारा प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे व तो फेटाळण्यास पात्र आहे. जाबदार यांनी अर्जदार हिचा कोणताही घरगुती छळ केला नसून अर्जदार ही स्वतःहून घर सोडून गेल्याने अंतरिम पोटगीचा अर्ज फेटाळण्याची विनंती केली.

## मुद्दे

५. अर्जदार यांचा अर्ज व जाबदार यांचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षाच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. त्यावरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचा निष्कर्ष खालील दिलेल्या कारणांसह नोंद करीत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | जाबदार यांनी अर्जदाराचा घरगुती हिंसाचार केला हे अर्जदार प्रथमदर्शनी शाबीत करतात का ? | होकारार्थी |
| २. | अर्जदार पोटगी म्हणून दरमहा २५,०००/– रुपये अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का ? | रक्कम रुपये ८ हजार दरमहा. |
| ३. | काय हुकुम ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो. |

## युक्तीवाद

६. अर्जदार यांचे वकील एम. डी. शिंदे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार जून २०२३ पासून तिच्या माहेरी राहत असून तिच्या उपजिवीकेसाठी कसलेही आर्थिक पाठबळ नसून ती पूर्णपणे जाबदार क्र. १ यांच्यावर अवलंबून आहेत. जाबदार

यांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. अर्जदार हिला आर्थिक मदत म्हणून पोटगीची नितांत गरज असल्याने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

७. याउलट जाबदार यांचे वकील श्री. आर. बी. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जदार हिला सासरी नांदावयाचे नसून माहेरीच रहावयाचे असून ती स्वतःहून माहेरी गेली आहे. अर्जदार यांनी नमुद केलेली विनंती संयुक्तीक नसून अर्जदार ही स्वतःहून पतीचा त्याग करुन माहेरी राहत असून ती पोटगी मिळण्यास पात्र नसल्याने अर्ज नामंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १साठी :–**

८. घरगुती हिंसाचार कायद्याखाली वर्तमानकाळात एकत्रीत राहणे विचारात घेतले नसून भूतकाळात एकत्रीत राहणे हे देखील विचारात घेतलेले आहे. तसेच हे देखील प्रचलित कायद्याचे तत्व झालेले आहे की, घरगुती हिंसाचार कायद्याखाली अंतरिम पोटगी मागताना अर्जदाराने प्रथमदर्शनी जाबदार याने तिच्यावर घरगुती हिंसाचार केला ही बाब स्पष्टपणे नमुद करणे जरुरीचे आहे. जाबदार यांनी जरी त्यांच्यावरील आरोप फेटाळले असले तरी अंतरिम अर्जाचा विचार करताना जाबदार यांचा बचाव महत्वाचा नसून अर्जातील कथनांचा विचार करता प्रथमदर्शनी जाबदार विशेषतः जाबदार क्र. १ यांनी अर्जदार हिचा घरगुती हिंसाचार केला आहे की कसे हे पाहणे जरुरीचे ठरते. त्या अनुषंगाने अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता अर्जदाराने स्पष्टपणे नमुद केले आहे की, लग्नानंतर लगेचच जाबदार यांनी तिचा छळ करण्यास सुरुवात केली.

अर्जदार हिने स्पष्टपणे अर्जात नमुद केले आहे की, जाबदार क्र. १ हा तिला आर्थीक, मानसिक व शारिरीक त्रास देत होता. कोणतीही स्त्री ही लग्नानंतर तात्काळ विनाकारण स्वतःहून घर सोडून जाईल हे प्रथमदर्शनी मान्य करता येण्यासारखे नाही. तिला शिवीगाळ करुन मारहाण करणे या बाबी शारिरीक व मानसिक हिंसाचार या संज्ञेमध्ये मोडतात. अर्जदार ही सन २०२३ पासून तिच्या माहेरी राहत असून पत्नीच्या पालन पोषणासाठी पतीने आर्थिक मदत न करणे ही बाब देखील आर्थिक हिंसाचार या संज्ञेमध्ये बसते. जाबदारच्या वकीलांनी युक्तीवाद केला की, अर्जदार लग्न झाल्यानंतर काहीच महिने जाबदारासोबत नांदली. यावर माझे असे मत आहे की, घरगुती हिंसाचार कायदा २००५ नुसार अर्जदार काही काळापर्यंत राहिली व तिच्यावर घरगुती अत्याचार करण्यात आला हे पुरेसे आहे. हे सर्व मान्य आहे की, जाबदार त्याचे आई व भावासोबत राहत आहे. घरातील किरकोळ वाद होणे हे सहाजीकच आहे. हे सर्वस्व मान्य आहे की, अर्जदाराने प्रस्तुच्या दाव्या व्यतिरीक्त इतर कोणतीही दिवाणी किंवा फौजदारी खटले दाखल केले नाहीत. हे सुध्दा जाबदाराला मान्य आहे की, अर्जदाराने त्यास कायदेशीर नोटीस पाठवली व त्याने त्या नोटीसचे उत्तर दिले. अर्जदाराने तिच्यावर झालेले मानसिक व शारिरीक तसेच आर्थिक छळाबाबत दाव्यात नमुद केले आहे. सदरचा छळ पुनरुच्चीत होवू नये म्हणून मी इथे नमुद करीत नाही. अर्जदाराने दाव्यात नमुद केले की, जाबदार क्र. १ ते ३ च्या छळामुळे तिची प्री मॅच्युअर डिलीव्हरी करण्यात आली व उपचारा दरम्यान तिचे बाळ दि.१४/०३/२०२३ रोजी मयत झाले. अर्जदाराने परिच्छेद क्र. १९ मध्ये नमुद केले की, जाबदार क्र. १ याने अर्जदाराचे आई

वडीलांसोबत वाद सुरु केला व तिला नांदवणार नाही व तिच्या सोबत संसार करण्याची इच्छा नाही असे बोलून नांदवण्यास नकार दिला. दि.१७/०३/२०२३ रोजी अर्जदार तिचे आई वडीलांसोबत माहेरी आली. त्यानंतर आजपर्यंत अर्जदार तिचे आई वडीलांसोबत माहेरी राहत आहे. या दरम्यान आजपर्यंत जाबदार क्र. १ ने तिला नांदण्यासाठी कोणतेही प्रयत्न केलेले नाहीत. उलट अर्जदाराने दि.१८/०७/२०२३ रोजी तिला नांदण्यास घेवून जाण्यासाठी कायदेशीर नोटीस पाठवली. त्याचे उत्तर जाबदार क्र. १ ने दि.१४/०८/२०२३ रोजी दिले. सबब जाबदारांना अर्जदारासोबत झालेले लग्न मान्य असून जाबदार क्र. १ ची नैतीक व कायदेशीर जबाबदारी आहे की, तिचे पालनपोषन, खानपान, औषधे इ. करीता गैरसोय होवू नये. अर्जदाराचा दाव्यातील नमुद कथन व त्याचेसोबत शपथपत्र दाखल केले आहे. त्यामुळे तिने कलम ३ महिलांचा घरगुती छळा पासून संरक्षण कायदा २००५ खालील प्रथमदर्शनी नमुद केले आहे. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ साठी :-**

९. जाबदार यांनी अर्जदार हिचा घरगुती हिंसाचार केला याबाबीचा सकृत दर्शनी निष्कर्ष नोंदवल्यानंतर अर्जदार हिला पोटगी म्हणून रक्कम रुपये २५,०००/- दरमहा मिळण्यास पात्र आहे का हे पाहणे जरुरीचे आहे. अर्जदार यांच्या म्हणण्यानुसार जाबदार यांची आर्थिक परिस्थिती चांगली असून अर्जदार आजरोजी असहाय्य व तिच्याकडे कसलेही जीवन जगण्याचे साधन नाही.याउलट जाबदार क्र. १ ने मान्य केले आहे की, तो आय सी आय सी आय बँकेत नोकरीवर आहे व त्यास दरमहा

४१,६१८/–रुपये इतका पगार भेटतो. जाबदाराने अर्जदार कुठेही काम करते असा बचाव घेतला नाही.केवळ त्याने अर्जदार विभक्त राहण्याचा हट्ट करते, घटस्फोट मागते, अपमान करते, मोबाईलमध्ये व्यस्त राहते इत्यादी आरोप केले आहेत. जाबदार क्र. १ ने निशाणी क्र.१२ अन्वये त्याच्याकडे असलेलया मालमत्ता, उत्पन्न, खर्च व देणेबाबत शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये त्याने मान्य केले आहे की, त्यास नोकरी आहे, त्याला घरखर्च ८ हजार, वैद्यकीय खर्च १० हजार इतर खर्च ५ हजार असा एकूण २३ हजार रुपये खर्च लागतो. तसेच त्याच्यावर अवलंबून असलेल्या आई व भाउ वर खर्च १८ हजार रुपये लागतो. सबब माझे असे मत आहे की, जाबदार क्र. १ याला ४१,६१८/– रुपये दरमहा पगार आहे व २३ हजार रुपये खर्च होतात. तेव्हा सुध्दा १८ हजार वजा करुन त्याच्याकडे २३ हजरा रुपये शिल्लक राहतात. सबब त्याच्याकडे पुरेसे उत्पन्न आहे व तो अर्जदाराला पोटगी देण्यास समर्थ आहे.

**१०.** वरील चर्चेनुसार माझे असे मत आहे की, जाबदार कडे पुरेसे उत्पन्न असून ते स्वतःचा उदरनिर्वाह करु शकतात. तसेच हे मान्य आहे की, सध्या अर्जदार तिचे आईवडीलांकडे कुंडल येथे रहात आहे. तिला जिवन जगण्यासाठी कोणताही उत्पन्नाचा स्त्रोत नाही. त्यामुळे जाबदार अर्जदाराची खाण–पान, औषधोपचार व इतर खर्चासाठी तात्पुरती पोटगी देण्यास जबाबदार आहे.

**११.** जाबदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे नमुद केले आहे की, जाबदार यांची जबाबदारी व जाबदार क्र. २ या सतत आजारी असून त्यांचीही जबाबदारी जाबदारवर आहे. जाबदार क्र. १ यांनी पत्नी या नात्याने अर्जदारचे पालन पोषण करणे

याची सर्वस्वी नैतिक व कायदेशीर जबाबदारी ही जाबदार क्र. १ यांची असून ती त्यांनी पार पाडली नाही. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत असून तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही.

**१२.** घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २० अन्वये अर्जदाराला अर्थिक मदत/अंतरिम पोटगी म्हणून अंतरिम आदेश पारीत करु शकते. अर्जदार हिला लागणारा पालन पोषणाचा खर्च, दैनंदिन खर्च व वैद्यकीय उपचार या सर्व बाबींचा तसेच जाबदार क्र. १ यांचे आर्थिक उत्पन्नाचा विचार करता अर्जदार हिला पोटगी म्हणजेच आर्थिक मदत म्हणून रक्कम रुपये ८ हजार दरमहा द्यावेत असा आदेश पारीत करने न्यायाच्या दृष्टीने योग्य होईल. सबब मी मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष त्याप्रमाणे देत असून मुद्दा क्र. ३ साठी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. जाबदार क्र. १ याने अर्जदार हिला अर्ज दाखल तारखेपासून ते अर्जाचा निकाल लागेपर्यंत घरगुती हिंसाचार कायद्याच्या कलम २३ सह कलम २० अन्वये दरमहा आर्थिक मदत / पोटगी म्हणून रक्कम रुपये ०८ हजार द्यावी असा आदेश देण्यात येतो.

३. अर्ज दाखल तारखेपासून ते अंतरिम अर्जावरील आदेश होईपर्यंतची रक्कम ही जाबदार क्र. १ याने सदर आदेश पारीत झाल्यापासून १५ दिवसांत अर्जदार

यांना द्यावी व तेथून पुढे रक्कम ही प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आतमध्ये अर्जदार यांना द्यावी असा आदेश देण्यात येतो.

४. अर्जदार व जाबदार यांना सदर आदेशाची प्रत घरगुती हिंसाचार कायदा कलम २४ अन्वये मोफत देण्यात यावी.

**sd/-**

**दि. २१/०२/२०२४** **(आय. ए. वाय. ए. खान)**

**पलूस.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पलूस**

## CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | J. A. Salunkhe<br>Stenographer Grade III |
| Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Palus |
| Date | : | 21/02/2024 |
| Signed by P. O. on | : | 21/02/2024 |
| Uploaded on | : | 22/02/2024 |